Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-XI | Nov. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# बौद्ध धर्माच्या लोपाची चिकित्सक मीमांसा

प्रवीण बोरकर
सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग,
आर. के. तलरेजा महविद्यालय,
उल्हासनगर, मुंबई विद्यापीठ,
मुंबईशी कायम संलग्नित.

**विषय ओळख :**

भारतातून बौद्ध धर्माचा लोप, ऱ्हास वा शेवट होण्याची अथवा भारतातून बौद्ध धर्म परागंदा होण्याची विविध प्रकारची कारणमीमांसा देशीव विदेशी अभ्यासक व लेखकांकडून आजवर करण्यात आलेली आहे. संपूर्ण भारताला व्यापून टाकणारा, सम्राट अशोक, कनिष्क आणि हर्षवर्धन यांनी प्रयत्नपूर्वक प्रचार व भारताचे सिमोलंघन करून इतर देशांमध्ये प्रसार पावून स्थिरावलेला बौद्ध धर्म भारतातून अगदी अल्प कालावधीतून लोप कसा पावला ? हा लेखक, अभ्यासक, तत्वचिंतक, धर्मपंडितबौद्ध धर्मीय, इतिहासकार व सामान्य माणूस या सर्वांच्या जिज्ञासेचा विषय झालेला आहे.वेळोवेळी अनेकांकडून या विषयावर लेखन झालेले आहे, असे असले तरी या विषयावरच्या लेखनाबाबतीत आजही मोठ्या प्रमाणात मते-मतांतरे आहेत. त्या मतांचा आढावा घेवून त्याची चिकित्सक मीमांसा करण्याचा उद्देश प्रस्तुत लेखामागे आहे.

**मुख्य शब्द :**

बौद्ध धर्म, गौतम बुद्ध, सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन, बौद्ध धर्माचा लोप, मुस्लिम आक्रमण, ब्राह्मणी, पुष्यमित्र शुंग, शशांक, शंकराचार्य, क्रांती, प्रतिक्रांती, डॉ. आंबेडकर, मिहिरकुल इत्यादी.

**मीमांसा:**

भारतातून बौद्ध धर्म लोप पावण्याची अनेक कारणे सांगितली जातात त्यात, बौद्ध धर्माच्याऱ्हासासाठी मुस्लिम आक्रमण, ब्राह्मणी शासकांचे अन्याय अत्याचार, बौद्ध धर्मातील अंतर्गत दुर्बलता वा त्यात वेळोवेळी उत्पन्न झालेले दोष, आर्थिक कारणे, संघातील अनाचार, राजाश्रयाचा अभाव,धर्मांतर्गत अनेक पंथ,लोकपाठींब्याचा अभाव,पुष्यमित्रशुंगवशंकराचार्यांची प्रतिक्रांती,संघातील ब्राह्मणांचा शिरकाव अशी एक ना अनेक कारणे सांगितली जातात,परंतु हे सर्व करतांना एका महत्त्वाच्या बाबीकडे मात्र सपशेल दुर्लक्ष केले जाते ती बाब म्हणजे या संदर्भात असलेल्या पुराव्यांची होय. बौद्ध धर्माच्या सर्वश्रुत विदुषी गेल आम्वेट यांच्या मते, "भारतात बौद्धधर्माचा ऱ्हास का झाला याची मीमांसा करताना सुलभीकरणाला विरोध केला जातो त्याचे प्रमुख कारण ऐतिहासिक पुराव्यांचा अभाव हे

आहे"[१]प्राचीन भारताच्या संदर्भात साधनांची मोठी अडचण आहे. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी 'ग्रीक व चीनी' प्रवाश्यांच्या लेखनाचा आधार घेतला जातो. प्रस्तुत विषयासंदर्भात तपशील पुरवणारे बौद्ध साहित्य भारतातून नष्टकरण्यात आल्यामुळे श्रीलंका, तिबेट व चीनमधील जपलेल्या हस्तलिखितांच्या आधारे बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला जातो.[२]

प्राचीन भारताच्या इतिहासाबाबत पुराव्यांच्या अभावाचीपूर्तता भारतीय आणि परदेशी इतिहासकार धार्मिक ग्रंथातून करतात. आणि अशी पूर्तता करणे ही अपरिहार्य बाबही ठरते, मात्रधार्मिक ग्रंथांचा वापर करतांना त्यावर असलेली इतिहासकारांची श्रद्धा ही निरपेक्ष इतिहास विश्लेषणासाठी मारक ठरते. नलिनी पंडित यांच्या मते, "एकोणिसाव्या शतकात, भारताच्या प्राचीन इतिहासाच्या संशोधनाला जेव्हा प्रारंभ झाला तेव्हा पहिल्या पिढीतील संशोधक उच्चवर्णीयहोते, प्राचीन धर्मग्रंथांबद्दल त्यांच्यामनात आदर व भक्तिभाव होता. शिवाय या सर्व ग्रंथाचे कर्ते ब्राह्मणच होते. या ग्रंथांमध्ये उच्चवर्णियांच्या हितसंबंधांचे समर्थन केलेले होते; आणि वर्णव्यवस्थेमुळे मिळालेल्या विशेषाधिकारांचा त्याग करण्याची त्यांच्या मनाची तयारी नव्हती. साहजिकच, उच्चवर्णियांच्या संशोधनावर मर्यादा पडल्या.धर्मग्रंथामध्ये अध्याहृत असलेल्या सामाजिक तत्त्वज्ञानाची आधुनिक दृष्टीकोनातून निस्पृहपणे त्यांनी चिकित्सा केली नाही."[३]गेल आम्वेट सुद्धा लिहितात की, "बौद्ध विचार भारतातून नाहीसा होणे याचा अर्थ भारतातून अतिशय मोलाची मीमांसा व इतिहासलेखन नाहीसे होणे असाही होतो. परिणामी ज्या नोंदी अस्तित्वात आहेत त्या ब्राह्मणी पूर्वग्रहदूषित दृष्टीवर आधारित आहेत."[४]यावरून हे स्पष्ट होते की, प्राचीन भारताबाबत लिहिणाऱ्या सुरुवातीच्या इतिहासकारांची दृष्टी ही पूर्वग्रहदूषित होती, त्यामुळे त्यांच्या इतिहास लेखनात व बौद्ध धर्माच्या मतांमध्ये एक प्रकारचा आपपरभाव दिसून येतो.

बौद्ध धर्माचा लोप हा प्रामुख्याने मुस्लिमांचे आक्रमण आणि ब्राह्मणवाद व त्याच्या समर्थक राजांच्या कत्तलीमुळे झाला, हेदोन मते सामान्यपणे प्रस्थापित झालेली आहेत.गेल आम्वेट यांच्या मते "इस्लामची तलवार भारतातील बौद्ध विचारांसाठी 'सर्वात मोठे संकट' जरी ठरली नाही तरी तिने बौद्ध विचारांवर आघात केला हे खरे आहे."[५]डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतेही "भारतात मुसलमानांच्या आक्रमणामुळे बौद्ध धर्माचा नाश घडून आला यामध्ये कुठलीही शंका नाही"[६]हे'क्रांती आणि प्रतिक्रांती' या पुस्तकातील विधान महत्त्वाचे आहे.बौद्ध धर्माचा लोप मुस्लिम आक्रमकांमुळे झाला यासाठीतथाकथित राष्ट्रवादी लेखक या विधानाचा पुरेपूर वापर करतात.परंतु हे करतांना मात्र याच पुस्तकातील आंबेडकरांच्या "भारतातील ब्राह्मणवादी शासकांनी बौद्ध बहुसंख्य जनतेवर अत्याचार केले. त्यांच्या या अत्याचार व छळापासून बचाव करण्याकरिता भारतातील बहुसंख्यांक बौद्ध जनतेने मोठ्या संख्येने इस्लाम धर्माचा स्वीकार केला आणि त्यांनी बौद्ध धम्माला कायमचे सोडून दिले."[७]या विधानाला सोयीस्करपणे विसरतात. बौद्धधर्माचे नावाजलेले विद्वान राहुल सांकृत्यायन यांनीही'तुर्कांच्या

आक्रमणाला बौद्ध धर्माच्या ऱ्हासासाठी एक महत्त्वाचे कारण मानले आहे."[८]परंतु या पैलूवर तिबेटी इतिहासकार तारानाथ लामा यांचेही मत विचारात घेण्यासारखे आहे. त्यांच्या मते, "तुर्कांनी जेव्हा बाराव्या शतकात विक्रमशीला व ओदंतपूरीनष्टकेले तेव्हा,राजाने तिथे आपले सैन्य ठेवले होते.त्यामुळे त्यांना ही दोन्ही स्थळे म्हणजे किल्ले वाटले आणि त्यामुळे असे घडले.[९]मुस्लिम आक्रमण बौद्ध धर्मासाठी हानिकारक ठरले यात वाद नाही,मात्र बौद्धधर्माचा लोप होण्यास कारणीभूत ठरलेल्या दुसऱ्या बाजूकडेही लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न आहे.

ब्राह्मणवादाचा विरोधक असलेल्या बौद्ध धर्माच्या ऱ्हासाला ब्राह्मणवादसुद्धा कारणीभूत झाला असून मुस्लिम आक्रमणामुळे एक प्रकारे देशी ब्राह्मणी कार्याला मुस्लिम आक्रमणामुळे मदतच झाली.इ. स. पूर्व सहाव्या शतकात भारतात गौतम बुद्धाच्या शिकवणुकीतून धार्मिक क्रांती होऊन बौद्ध धर्माचा उदय झाला. ही घटना प्राचीन भारताच्या इतिहासातीलच नव्हे तर जागतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना होय.त्यामुळेचडॉ. आंबेडकर या घटनेची तुलना फ्रेंच राज्यक्रांतीशी करतात.[१०]गौतम बुद्धाने वैदिक ब्राह्मणी धर्माच्या कर्मकांड, यज्ञ, यज्ञातील पशुबळी, चातुर्वर्ण, जातीव्यवस्थायांना विरोध केला व मानव मुक्तीसाठी सोपा मार्ग सांगितला. हा मार्ग समतेचा व बंधुत्वाचा होता. या मार्गाने प्रस्थापित वैदिक ब्राह्मणी धर्माला आव्हान दिले, त्यामुळे तेव्हापासून वैदिक ब्राह्मणी धर्म व बौद्ध धर्म यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली व त्याची परिणती ब्राह्मणांनी बौद्ध धर्माचा द्वेष करण्यात झाली. 'बौद्धपर्व' या पुस्तकाचे लेखक वा. गो. आपटेंच्या मते, बौद्धांनी वैदिक कर्मकांड नष्टकेले, यज्ञयागातली पशुहिंसा बंद केली याचा ब्राह्मणांना विशेष राग आला नाही, पण सर्व जातीच्या लोकांना बौद्धांनी त्यांच्या संघाचे द्वार मुक्त ठेवल्याने जातीसंस्था नष्ट होईल अशी भीती ब्राह्मणांना वाटल्याने त्यांनी बौद्ध धर्माचा द्वेष केला.[११]त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुद्धा "प्राचीन भारताचा इतिहास म्हणजे ब्राह्मणी धर्म व बौद्ध धर्म यांच्यातील प्राणांतिक संघर्षाचा इतिहास होय."[१२]असे म्हणतात. यावरूनवैदिक ब्राह्मणी धर्म व बौद्ध धर्म यांच्यातील संघर्षाने बौद्ध धर्माचा नाश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली हे नाकारता येत नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, "हिंदू भारतावर मुस्लिम आक्रमकांनी आक्रमणे केली. त्याचप्रमाणेब्राह्मणी आक्रमकांनी बौद्ध भारतावर आक्रमणे केली... ब्राह्मणशाहीने आपल्या आक्रमणाने बौद्ध धर्माचाही नाशही केला. इस्लामने हिंदू धर्माची जागा कधीही घेतली नाही. इस्लामने हिंदू धर्म नष्टकरण्याचे आपले कार्य कधीही पूर्णपणे केले नाही. ब्राह्मणशाहीने मात्र ते केले. त्यांनी धर्म म्हणून बौद्ध धर्माला बाहेर हाकलले आणि त्याची जागा घेतली."[१३]

बुद्धाचे पहिले पाच शिष्यब्राह्मणच होते. ब्राह्मणांनीबौद्ध धर्माचा प्रचार प्रसारातमोठे योगदान दिले यात वाद नाही. सुप्रसिद्धबौद्ध पंडित नागसेन, अश्वघोष, वसुबंधू, दिग्नाग यांच्यासह अनेक जन्मानेब्राह्मणच होते, त्यांनी बौद्ध धर्मावर महत्त्वपूर्णलेखन व भाष्य केलेली आहेत. असे असले तरी बौद्ध

धर्मातील महत्त्वाचा पंथ असलेल्या 'महायान' चे कर्तेही ब्राह्मणच होते, हे ही विसरता येणार नाही. महायान पंथ हा प्रामुख्याने बौद्ध धर्मातील ब्राह्मणी विचारांचे प्रतिनिधित्व करतो. वासुदेव गोविंद आपटे यांच्या मते, काही बौद्धधर्मी लोकांच्या मनावर ब्राह्मणधर्माचा पगडा बसून महायानपंथ निर्माण झाला आणि याच लोकात पुढे तांत्रिक मताचा प्रचार होऊन बौद्ध धर्माला हिडिस स्वरूप प्राप्त झाले.[१४]महायान पंथीयांनी 'पाली' ऐवजी अभिजनांच्या'संस्कृत' भाषेचा स्वीकार केला.[१५]पाली ऐवजी संस्कृतचा स्वीकार केल्याने सामान्य लोक बौद्ध धर्मापासून हळूहळू दूर जाऊ लागले. हा महायानाच्या ब्राह्मणी विचारांचा बौद्ध धर्मावरील परिणाम होता. चीनी प्रवासी हुएनत्संग यानेही याबाबतीत त्याच्या प्रवासवर्णनात लिहिलेले आहे.

ब्राह्मणी ग्रंथकार व विद्वानांनी वादविवाद करून बौद्ध धर्माला परास्त केल्याचा एक मतप्रवाह आहे. मात्र हे अर्धसत्य आहे.ब्राह्मणीविद्वानांनी शास्त्रार्थ करतांना बुद्धिवादी वादविवादापेक्षा कपटनीतीवर अधिक भर दिला. वा. गो. आपटे यांच्या मते, "... या टीकाकारांना बौद्धांचा पाडाव करावयाचा होता व त्याकामी त्यांची बुद्धी अपुरी पडेल अशी शंका येऊन की काय त्यांनी बौद्धांविषयी गैरसमज उत्पन्न करणाऱ्या दंतकथांचा किंवा कल्पना सृष्टीतल्या गोष्टींचा आधार घेतला, ही खेदाची गोष्ट आहे.[१६]ब्राह्मणीविचारांच्या शासकांनी बौद्धांची कत्तल करण्यास मागेपुढे पहिले नाही. यामुळेही बौद्ध धर्म स्वतःच्याच भूमीत परका ठरला. तिबेटी इतिहासकार तारानाथ लामा बौद्धांवरील पुष्यमित्र शुंगाच्याहिंसक हल्ल्यांची माहिती देतो. त्याच्या मते, "ब्राह्मण राजा पुष्यमित्र शुंगाने तीर्थिकांनासोबत घेऊन युद्धाला सुरुवात केली. मध्यदेशापासून ते जालंधर पर्यंत अनेक बौद्ध मठांना जाळून नष्ट केले.त्यांनी अनेक विद्वान भिक्खूंनाही जीवे मारले. परंतु त्यांच्यापैकी बहुतेक अन्य देशांमध्ये पळून गेलेत. परिणामी उत्तरेतून अवघ्या पाच वर्षात बौद्ध विचार लयाला गेला.[१७]प्रसिद्ध इतिहासकार रामशरण शर्मा सुद्धापुष्यमित्र शुंगानेबौद्धांच्या केलेल्या छळाच्या घटनेला स्वीकृती देतात.[१८]डॉ. आंबेडकरांनी, पुष्यमित्रशुंगाने बौद्ध धर्माविरुद्ध प्रतिक्रांती केल्याचे नमूद केलेले आहे. त्यांच्या मते, "पुष्यमित्राची क्रांती ही फक्त राज्यक्रांतीच असती तर त्याला बौद्ध धर्मीयांच्या छळाची मोहीम काढणे आवश्यक नव्हते. ही छळाची मोहीम गझनीच्या महंमदाने हिंदूविरुद्ध काढलेल्या छळाच्या मोहिमेपेक्षा निराळी नव्हती. पुष्यमित्राचा उद्देश मुख्यत: बौद्ध धर्म नष्टकरून ब्राह्मणी धर्माची स्थापना करणे हाच होता."पुष्यमित्र शुंगाबरोबरचशैव पंथाचा हूण राजा मिहिरकुल याने शेकडो बौद्धांनाठारकेल्याचे व गौड देशातील शिवभक्त शशांकानेबौद्ध गयेतील बोधी वृक्षाला कापून काढल्याचेही शर्मा सांगतात.[१९]डॉ. आंबेडकरांनीसुद्धा 'मिहिरकुल' व'शशांकच्या' अत्याचारी कृत्याबाबत लिहिलेले आहे.वा.गो.आपटेयांनीही या मताचा पुरस्कार केलेला आहे.मिहिरकुलची ब्राह्मणधर्मावर श्रद्धा असल्याचा पुरावा म्हणून आपटे त्याच्या नाण्यांवरील शिव व वृषभध्वज यांच्या कोरलेल्या मूर्तींचा हवाला देतात. तसेच कुमारील भट्टाच्या शिकवणीवरूनसुन्ध वा राजानेबौद्धांचा

अनन्वित छळ केल्याचेही ते नमूद करतात.[२०]याप्रसंगी प्रबोधनकार ठाकरे यांचेही लेखन विचारात घेण्यासारखे आहे. त्यांच्यामते, "इसवी सनाच्या ७-८ व्या शतकात भिक्षुकशाहीचे उद्धारक आद्य शंकराचार्य यांचा अवतार झाला. त्यांनी शुद्धी करून संघटनात सामील करून घेतलेल्या सिथियनांच्या उर्फ रजपुतांच्या पाठबळाने बौद्धांच्या भयंकर कत्तली करविल्या. त्यांच्या विहारांची नासधूस केली. उरल्या सुरल्या बौद्धांना देशधडीला लावले... ठिकठिकाणच्या बौद्ध विहारातल्या पवित्र वस्तूंचा आणि बौद्ध-मूर्तीचा उच्छेद केला आणि तेथे शंकराच्या पिंड्या थापल्या."[२१]रमेशचंद्र दत्त यांनीही हिंदू धर्मांत नवीन दीक्षित झालेल्या राजपुतांमध्ये स्वीकारलेल्या नविन धर्माला पुनर्जीवित करण्याचा मोठा उत्साह होता असे नमूद केलेले आहे.[२२]

हिंदुस्थानचा अधःपात बौद्धांनी केला असा वैष्णवपंथी ब्राह्मणांचा एक मोठा आरोप आहे.सावरकरांनीतर"बौद्ध धर्माविषयी भारतीय जनतेत जी चीड नि अप्रियता उत्पन्न होऊन बौद्धधर्माचा शेवटी नायनाट झाला त्याचे, एक मुख्य कारण, भारतीय बौद्धांनी स्वातंत्र्य नि भारतीय साम्राज्य यांशी वारंवार केलेले राष्ट्रद्रोही वर्तन हेच होते."असे लिहिलेले आहे.[२३]अश्याप्रकारचे अनेक आरोप तथाकथित राष्ट्रवादी व प्रखर देशाभिमानी म्हणविणाऱ्या लोकांकडून झाल्याचे दिसते.या आरोपांमध्ये सत्यता नसून असे आरोप हेतुपुरस्सर केले गेले असून त्यातबौद्ध धर्म, बौद्ध विचारांप्रती गैरसमज पसरविण्याचा उद्देश दिसतो.'Decline and Fall of Buddhism' या ग्रंथाचे व्यासंगी लेखक डॉ. के. जमनादास यांच्या मते, बौद्धधर्मावर विविध आरोप करून ते बौद्ध धर्माच्या ऱ्हासासाठी कसे कारणीभूत ठरले हे सांगणे, हा ब्राह्मणी प्रवृत्तीचा खोडसाळ प्रचार होय.[२४]प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते,"बौद्धधर्माने हिंदुस्थानला अधर्माच्याकुमार्गावर ढकलून दिलें,या वैष्णवांच्या खोडसाळ आरोपांत काडीइतकेही सत्य नाहीं. हिंदुस्थानच्या अध:पाताच्या दोषांचे खापरच जर कोणाच्याटाळक्यांत फोडायचे असेल, तर ते वास्तविक न्यायानें भिक्षू ब्राह्मणांच्याच होय."[२५]

प्राचीन भारतात मोजकेच राजे व राजघराणे वगळता बौद्ध धर्माला ब्राह्मणी धर्मासारखा राजाश्रय मिळाला नाही, यामागेही ब्राह्मणी विचारधारा कारणीभूत असल्याचे दिसते.बौद्ध धर्माचा पाया 'नैतिकतेवर' आधारित होता, तर ब्राह्मणी विचार साम, दाम, दंड, भेद व नीतीचा पुरस्कार करणारे होते. गेलआम्वेट यांच्या मते, "ब्राह्मणी तत्त्वज्ञानाने राजांना अमर्याद सूट दिली. बौद्ध किंवा जैन तत्त्वज्ञानाने असे केले नव्हते. राजांकडून कोणत्याही नैतिक स्वरूपाच्या मागण्या न करता ब्राह्मणी तत्त्वज्ञानाने त्यांना प्रतिष्ठा आणि मान्यता दिली. बौद्ध किंवा जैन परंपरेने, जे राजे त्यागाचा आदर्श लोकांसमोर ठेवणार नाहीत त्यांना फटकारले होते... भारतात बौद्ध विचार ब्राह्मणी विचारांच्या विरुद्ध असा एक पाया उभारू बघत होता.तेवढे सामर्थ्यबौद्ध विचारात होते. त्यामुळे त्याच्याकडे 'धोका' म्हणून पहिले होते. वैचारिक, सामाजिक व संस्थात्मकदृष्ट्या एका संकुचित, स्वार्थी दृष्टीने भारतीय राजांना बौद्ध

विचारापेक्षा ब्राह्मणी विचार अधिक उपयुक्त वाटला."[२६]त्यामुळे राजाश्रय मिळवून ब्राह्मणी धर्म टिकून राहिला व बौद्ध धर्माची वाताहत झाली.

बौद्ध धर्माचा भारतातून लोप झाल्यानेदेशवासीयांचे मोठे नुकसान झाले, कधीही न भरून निघणारे नुकसान झाले. बौद्ध धर्म जोपर्यंत भारतात अस्तित्त्वात होता तोपर्यंत समतेचा, बंधुत्वाचा, जातीनिरोधाचाविचारअस्तित्त्वात होता.मात्र बौद्ध धर्माच्या लोपाबरोबर तो विचारही मागे गेला.यामुळे ब्राह्मणी धर्माची नवीन आवृत्ती म्हणून पुढे आलेल्या हिंदू धर्माचेही मोठे नुकसान झाले. प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते, "उदारमनस्क बौद्ध धर्माची, त्याच्या जन्मभूमींतच, जी वाताहत व हद्दपारी झाली, तिचा हिंदू जणांच्या ऱ्हासाशीं आणिअधःपाताशीं बराच कार्यकारण भावाचासंबंध आहे, यात मुळींच संशय नाहीं. माझें तर असें स्पष्टमत आहे कीं, हिंदूस्थानांतून बौद्ध धर्माची हद्दपारी झाल्यामुळेंच हिंदू समाजाचा सर्वतोपरी अधःपात झाला."[२७]संतकबीर, संत रविदास, संत तुकाराम, संत गुरुनानक यांच्या व इतर संतांच्या माध्यमातून समतेचा व जातीनिरोधाचा बौद्ध विचार अधून मधून व्यक्त होत राहिला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाच्या उदयापर्यंतविविध मार्गाने कधी संघटीत तर कधी असंघटीत स्वरुपात, कधी साहित्याद्वारे, तर कधी पंथीय विचारधारा व चळवळ म्हणून हा विचार पुढे येण्याचा प्रयत्न करीत राहीला. समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाच्या विचारांना आधुनिक काळात खऱ्या अर्थाने भारताच्या विचारपटलावर जोरकसपणे मांडण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले व बौद्ध धर्माचा स्वीकार करून देशाला 'प्रबुद्ध भारताचा' मार्ग दाखविला.त्यामुळे पुन्हा भारतभूमीत बुद्धवाणीचाउदघोष होऊ लागलाआहे.

**निष्कर्ष:**

एकूणच भारतातून बौद्ध धर्माचा लोप होण्यास मुस्लिमांच्या आक्रमणाबरोबरच ब्राह्मणी विचारधारेचा बौद्ध धर्माप्रती असलेला द्वेष, ब्राह्मणी शासकांचे बौद्धांवरील अन्याय-अत्याचार, ब्राह्मणी विद्वानांचे कपटनीतीने बौद्धांना शास्त्रार्थात पराभूत करणे, साम, दाम, दंड, भेद या नितींचा वापर करून बौद्धांच्या नैतिकतेविषयी गैरसमज पसरविणे व लोकांची मने कलुषित करणे,बौद्धांना राजाश्रय न मिळू देणे, बौद्ध संघात शिरकाव करून महायान व इतर पंथांची निर्मिती करून बौद्ध संघाला विभक्त करणे ही कारणे जबाबदार ठरली.नैतिकतेवर आधारलेल्या बौद्ध धर्माला ब्राह्मणी विचाराने छळ, कपट, द्वेषवबौद्धांचा संहार करून प्रतिक्रांतीचे वातावरण तयार केले त्यात मुस्लिम आक्रमणाची भर पडून बौद्ध धर्माचा लोप झाला.

**संदर्भ:**

1. आम्वेट गेल, भारतातील बौद्धधर्म, ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हान, सेज पब्लिकेशन्स इंडिया, २०१६, पृ. २१४
2. कित्ता

3. पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथालीप्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रणआक्टोबर २००५, पृ. १०९
4. आम्वेट गेल,भारतातील बौद्धधर्म, ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हान,पृ.२१६
5. कित्ता,पृ. २१४
6. मून वसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग एंड स्पिचेस, खंड-३, महाराष्ट्र शासन, मुंबई, पुनर्मुद्रण २०१४, पृ. २२९
7. कित्ता, पृ.२३०
8. सांकृत्यायन राहुल, बौद्ध संस्कृती, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, द्वितीय संस्करण, २०१६, पृ. ६८
9. तारानाथ लामा, हिस्टरी ऑफ बुद्धीजमइन इंडिया, (एडीटेड बाय देवीप्रसाद चटोपाध्याय), मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स, दिल्ली, रिप्रिंट, १९९०, पृ. ११८-११९
10. मूनवसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग एंड स्पिचेस, खंड-३,पृ. १५३
11. आपटे वासुदेव गोविंद, बौद्धपर्व, समता प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती, आक्टोबर २००६, पृ. १६३-१६४
12. मूनवसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग एंड स्पिचेस, खंड-३,पृ. २६७
13. कित्ता,पृ.२७५
14. आपटे वासुदेव गोविंद,बौद्धपर्व, पृ. १६१
15. शर्मा रामशरण, प्रारंभिक भारत का परिचय, ओरियंटब्लैकस्वॉन प्राइवेट लिमिटेड, हैदराबाद, पुनर्मुद्रण, २०१७, पृ. १४१
16. आपटे वासुदेव गोविंद,बौद्धपर्व, पृ. १६१
17. तारानाथ लामा,हिस्टरी ऑफ बुद्धीजमइन इंडिया, पृ. १२१
18. शर्मा रामशरण,प्रारंभिक भारत का परिचय, पृ. १४२
19. कित्ता
20. आपटे वासुदेव गोविंद,बौद्धपर्व, पृ. १५०
21. मिरासदार द. मा. व इतर (संपा.) प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय, खंड चौथा,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, नोव्हेंबर२०००, पृ. १८९-१९०
22. दत्त रमेशचंद्र, प्राचीनभारतीय सभ्यता का इतिहास, प्रकाशन संस्थान नयी दिल्ली, प्रस्तुत आवृत्ति, २०१७, पृ. ४६८
23. सावरकर विनायक दामोधर, भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने, मनोरमा प्रकाशन, मुंबई, चौदावी आवृत्ती, २०११,पृ. ७३
24. जमनादास के., डिक्लाइन एंड फॉलऑफ बुद्धिझम, अ ट्रजेडीइन एंसेंट इंडिया, ब्लुमून बुक्स, नई दिल्ली, पृ. १२
25. मिरासदार द. मा. वइतर (संपा.), प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय, खंड चौथा, पृ. १४६
26. आम्वेट गेल, भारतातील बौद्धधर्म, ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हान, पृ.२२४-२२५
27. द. मा.मिरासदार व इतर (संपा.), प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय, खंड चौथा,पृ. १४६